महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

# गृहपाल, मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागास मुलींचे शासकिय वसतिगृह, अलिबाग जि.रायगड

दिव्या अपार्टमेंट, आर.सी.एफ.गेटसमोर वेश्वी-अलिबाग, जि - रायगड

EMAIL- ghgalibag0913@gmail.com TEL NO . 8767339974

जा.क्र.मामुशावगृहअरा/ प्रवेश /2022 -2023 / भा.क- 42 दिनाक 10/06/2022

प्रति,

मा .मुख्याध्यापक /प्राचार्य ,

J.S.M. college

Alibag - Raigad.

**विषय –वसतिगृह विद्यार्थिनी ऑफलाइन प्रवेशाबाबत ...............**

महोदय ,

महाराष्ट्र शासनाचे सामाजिक न्याय विभागाअंतर्गत मागासवर्गीय तथा आर्थिक दृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह दिव्या अपार्टमेंट, आर.सी.एफ.गेटसमोर वेश्वी-अलिबाग –रायगड येथे कार्यरत आहे .

सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षा करिता वसतिगृह प्रवेश अर्ज हे ऑफलाइन भरण्याकरिता ची प्रक्रिया सुरु आहे .तरी सोबत जोडलेल्या परिपत्रकास आपले मार्फत प्रसिद्धी देऊन अनुसूचित जाती ,जमाती या प्रवर्गातील गरजू ,होतकरू ,हुशार ,अनाथ ,अपंग ,व मागासवर्गीय विद्यार्थिनीच्या पालकांच्या निदर्शनास आणून द्यावे व या शासकीय योजनेचा लाभ गरजू पर्यंत पोहोचेल या साठी आवश्यक ते सहकार्य करावे .

आपली विश्वासू

(सही)

WARDEN

Govt. B.C. & O.B.C.Girls Hostel

Alibag, Dist. Raigad

✓ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग फाईल

✓ सोबतचे परिपत्रक विद्यार्थी सूचना फलकात लावावे व ग्रुपवर टाकावे

✓ महाविद्यालयाच्या वेबसाईटवर टाकावे.

J.S.M. COLLEGE, ALIBAG

INWARD

No. 158 File ___

Date. 14/06/2022 Sign.

(सही) 14/6/2022

दिव्य अपार्टमेंट ,अपार्टमेंट, आर .सी .एफ .गेटसमोर वेश्वी ,अलिबाग ,जि-रायगड

**महारष्ट्र शासनाचे सामाजिक न्याय विभागाच्या अलिबाग ,जि .रायगड येथील मागासवर्गीय तथा आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृहात सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात मार्फत प्रवेश .**

महाराष्ट्र शासनाचे सामाजिक न्याय विभागाअंतर्गत मागासवर्गीय विध्यार्थिनीकरिता मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह ,गोंधळपाडा अलिबाग जि .रायगड येथे कार्यरत आहे . येथे इ .8वी पासून गरीब ,हुशार ,होतकरू ,मागासवर्गीय अनुसूचित जाती- ८० %,अनुसूचित जमाती -३%,विमुक्त जाती भटक्या जमाती -५ %,आर्थिक मागास व इतर मागासवर्गीय दारिद्र रेषे खालील कुटुंबातील विद्यार्थिनी -५ %,विशेष मागास प्रवर्ग -२ %,अनाथ -२%,अपंग -३%.यांना गुणवत्ता नुसार प्रवेश दिला जातो .वसतिगृहात विध्यार्थिनी करिता मोफत निवास व्यवस्था असून नाष्टा-दरररोज पोहे /शिरा /उपीट इ .पैकी एक उकडलेली दोन अंडी ,सफरचंद ,ऋतूमानानुसार एक फळ व दुध तसेच भोजन व्यवस्थेमध्ये जेवण (डाळ ,भात ,चपाती ,भाजी /उसळ ,लोणचे ,पापड इ .सह आठवड्यातून दोन वेळा मांसाहार )देण्यात येते .

अभ्यासासाठी लागणारी वह्या ,पुस्तके ,शैक्षणिक व लेखन साहित्य देखील विनामूल्य पुरविले जाते .तसेच दैनंदिन व वयक्तिक खर्चाकरिता म्हणून दरमहा रु .६००/-निर्वाहभत्ता दिला जातो .

शालेय व गणवेश पात्र महा.विध्यार्थिनीना दोन संचाकरिता गणवेश भत्ता दिला जातो .त्या व्यतिरिक्त रेनकोट/छत्री भत्ता, संगणक ,ग्रंथालय सुविधा ,क्रीडा साहित्य ,मनोरंजन इ .अनेक सुविधा उपलब्द आहेत

प्रवेश पात्र विद्यार्थिनीच्या पालकांचे सर्व मार्गांनी मिळून वार्षिक उत्पन्न अनुसूचित .जाती,अनुसूचित जमाती विद्यार्थिनीकरिता रु .२५००००/-, चे आत व विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग विद्यार्थिनीकरिता रु १०००००/- चे आत असावे

ऑफलाईन प्रवेश अर्जासोबत आवश्यक पुढील कागदपत्राच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे .

1) तहसिलदार यांच्या सहीचा सन २०२२-२०२३ मधील उत्पन्न दाखल्याची सत्याप्रत .
2) जातीचे मुलकी अधिकाऱ्याचे प्रमाणपत्राची सत्यप्रत .
3) मागील इयत्ता उत्तीर्ण झाल्याचे गुण पत्रकाची सत्यप्रत
4) आधारकार्डची सत्यप्रत
5) शाळा /कॉलेजचे बोनाफाईड
6) रेशनकार्ड ची सत्यप्रत

सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह प्रवेश अर्ज हे ऑफलाईन फॉर्म भरण्याकरिता सदर वसतिगृहाच्या अधिक माहितीकरिता गृहपाल यांचेशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा'

गृहपाल
मागासवर्गीय तथा आर्थिकदृष्ट्या मागास
मुलींचे शासकीय वसतिगृह अलिबाग-रायगड
सौ .यु .एस .गुजेला
8767339974